04-05-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 5/3/2025 11:34 PM Page 1



निवडक



काणकोण : पालिका क्षेत्रातील पाटणे, केपे येथील दुर्गंधीयुक्त जलस्त्रोताची पाहणी करताना निरिक्षक प्रणय नाईक, कनय देसाई व शुभम कोमरपंत.

## पाटणे, केपे नैसर्गिक जलस्त्रोताची संयुक्तरीत्या पाहणी

■ टीम दैनिक हेराल्ड

**आगोंद, दि. ३ :** काणकोण पालिका क्षेत्रातील पाटणे, केपे या नैसर्गिक जलस्त्रोताची दुर्गंधी येत असल्याच्या तक्रारी नगरसेवक शुभम कोमरपंत यांनी काणकोण आरोग्य खात्यात केली होती. या तक्रारीची दखल घेऊन आज शुक्रवार दि. २ जून रोजी आरोग्य खात्याचे प्रतिनिधी, काणकोण पालिका प्रतिनिधी व नगरसेवक कोमरपंत यांच्या टीमने पाहणी क.
यावेळी नगरसेवक शुभम कोमरपंत, काणकोण पालिकेचे सुपरवायजर कनय देसाई व आरोग्य खात्याचे स्वच्छता निरीक्षक प्रणय नाईक यांनी निरिक्षण केले.
या ठिकाणी अनेक होटेल्स व इतर आस्थापने वरील जलस्त्रोतात प्रक्रिया न केलेले सांडपाणी टाकत असल्याचे आढळून आले. निरिक्षक नाईक यांनी आउटलेट पाईप्स पाहिल्या आणि पुढील चौकशी करून संबंधितांना नोटिसा बजावल्या जातील.

---

## स्नेहमंदिर होम नर्सिंग स्कूलमध्ये प्रवेश सुरू

■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. ३ :** बांदिवडे फोंडा येथील गोवा हिंदू असोसिएशन स्नेमंदिर या संस्थेमध्ये चौदा वर्षे कै. विष्णू मुकूंद कुवेलकर नर्सिंग होम कार्यरत आहे. तिथे ‘गृहपरिचारिका’ हा अभ्यासक्रम चालू आहे. या अभ्यासक्रमासाठी २५ मे पर्यंत प्रवेश अर्ज करता येणार आहे, अशी माहिती संस्थेतर्फे देण्यात आली आहे.
हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर राज्य सरकारच्या मनुष्यबळ विभागाकडून मान्यताप्राप्त अशा या अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र देण्यात येते. यंदाची चौदावी तुकडी नोव्हेंबर २०२५ मध्ये उत्तीर्ण होऊन बाहेर पडणार असून दिवसें-दिवस गृहपरिचारिकांची मागणी वाढत आहे. या अभ्यासक्रमासाठी असणारे शुल्क, शालेय साहित्य प्रात्यक्षिक प्रयोग शाळेचे आयोजन, येथील वास्तव्य, नाश्ता, भोजन निवासस्थानापासून स्नेहमंदिरापर्यंत येण्यासाठी लागणारा प्रावासखर्च स्नेहमंदिर नर्सिंग स्कूलतर्फे केला जातो.
गोव्यातील अल्पउत्पन्न असलेल्या गरजू, होतकरू नववी पूर्ण झालेल्या तसेच १८ वर्षे वर्य पूर्ण केलेल्या विद्यार्थी विद्यार्थिनींसाठी, स्वतःच्या पायावर उभे राहण्याकरिता स्नेहमंदिरातर्फे ही उत्तम संधीचा विद्यार्थ्यांसाठी लाभ घ्यावा, असे आवाहन बंदिवडे फोंडा, येथील गोवा हिंदू असोसिएशन स्नेहमंदिर या संस्थेने केले आहे.

---

## बांबोळी हॉटेल प्रकल्पाचे काम थांबवण्याचे आदेश

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २ :** गोवा राज्य पर्यावरण प्रभाव मूल्यांकन प्राधिकरण आणि नगर नियोजन विभागाने बांबोळी येथील वर्ल्डवाइड रिसॉर्ट्स अँड एंटरटेनमेंट प्रायव्हेट लिमिटेड यांच्या चालू बांधकाम प्रकल्पावर कारवाई करत काम त्वरित थांबवण्याचे आदेश दिले आहेत. हा आदेश पर्यावरण प्रभाव मूल्यांकन अधिसूचना २००६ अंतर्गत आवश्यक असलेली पर्यावरणीय मंजुरी न घेता बांधकाम सुरू केल्याच्या पार्श्वभूमीवर देण्यात आला आहे.
नगर नियोजन विभागाचे उपनगर नियोजक प्रकाश बांदोडकर यांनी जारी केलेल्या आदेशात नमूद करण्यात आले आहे की, तांत्रिक मंजुरी ही अशा अटींच्या अधीन होती की, बांधकाम सुरु करण्यापूर्वी संबंधित प्राधिकरणाकडून आवश्यक एनओसी घेणे अनिवार्य आहे. तथापि, आपण पर्यावरण मंजुरी न घेता बांधकाम कार्य सुरू केल्याचे निदर्शनास आले असून, त्यामुळे मंजुरीतील अटींचे उल्लंघन झाले आहे.
यापार्श्वभूमीवर, सरकारकडून प्राप्त सूचनेनुसार, संबंधित प्रकल्पाचे सर्व बांधकाम तातडीने थांबविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. आदेशात स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे की, नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल प्रकल्पावर तत्काळ कारवाई आवश्यक आहे.
दरम्यान, अलीकडेच बांबोळी येथील डोंगर उतार आणि समुद्रकिनाऱ्यावरील बेकायदेशीर बांधकामांप्रती निषेध नोंदवण्यासाठी स्थानिक कार्यकर्त्यांनी मेणबत्त्या लावून निदर्शने केली. कार्यकर्त्यांनी या परिसरात चाललेल्या बांधकामामुळे पर्यावरणास गंभीर धोका निर्माण झाल्याचे सांगत संबंधित उपक्रम थांबवण्याची तसेच नष्ट झालेल्या पर्यावरणीय भागांचे पुनरुज्जीवन करण्याची मागणी केली आहे. या प्रकल्पात झाडांची बेकायदेशीर तोड, उतारावर अति खोदकाम आणि नैसर्गिक जलस्त्रोतांचे नुकसान केल्याचा आरोप करत कार्यकर्त्यांनी प्रशासनाकडे कडक कारवाईची मागणी केली आहे.

# चेंगराचेंगरीला प्रशासनाचा गलथानपणा कारणीभूत असल्याचा आरोप



■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. ३ :** शिरगावातील लईराई जत्रेच्या दिवशी झालेल्या चेंगराचेंगरीमुळे सहा भाविकांचा मृत्यू झाला आणि अनेक जण जखमी झाले. या दुर्घटनेवर विविध पक्षांचे नेते आणि सामाजिक संघटनांनी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली असून, राज्य सरकारच्या निष्काळजीपणावर गंभीर आरोप केले आहेत. संबंधित घटनेची चौकशी करण्याची मागणी जोर धरत आहे, तसेच पीडितांच्या कुटुंबीयांना मदतीची मागणी केली जात आहे.

> माझे काका एका तरुणीला मदत करण्यासाठी गेले होते. तिला वाचवताना ते जमिनीवर पडले आणि जवळपास ५० जण त्यांच्या अंगावरून गेले. त्यांच्या बरगड्यांना मार बसला असून त्यांना पूर्वीपासून पाठीच्या दुखण्याचा त्रास आहे. सध्या त्यांचा चेहरा सुजलेला आहे, ते बोलू शकत नाहीत. जिच्यासाठी त्यांनी जीव धोक्यात घातला, ती दुर्दैवाने वाचू शकली नाही.
> -**सुधांशू कळंगुटकर** , प्रत्यक्षदर्शी

> जिल्हा प्रशासन आणि गृह मंत्रालयासह उच्चस्तरीय जबाबदारी निश्चित करण्याची आमची मागणी आहे. मृतांच्या कुटुंबियांना १ कोटी रुपये आणि जखमींना १० लाख रुपये अंतरिम मदत दिली जावी.
> -**अमित पालेकर,** आप गोवा अध्यक्ष

> शिरगाव जत्रेत झालेल्या चेंगराचेंगरीमुळे मला खूप दुःख झाले आहे. सहा भाविकांचा मृत्यू आणि अनेक जण जखमी झाले आहेत. माझ्या भावना प्रियजनांना गमावलेल्या शोकाकुल कुटुंबांसोबत आहेत. जखमींच्या लवकर बरे होण्यासाठी आणि शोकाकुल कुटुंबांसोबत एकता दाखवण्यासाठी मी सर्वांना आवाहन करतो.
> -**युरी आलेमाव,** विरोधी पक्षनेते

> ही घटना स्थानिक प्रशासनाच्या अपयशाचा परिणाम होती. आम्ही मागणी करतो की सरकारने मृतांच्या कुटुंबियांना प्रत्येकी १ कोटी रुपये आणि जखमींना वेगवेगळ्या सरकारी रुग्णालयांमध्ये जीवासाठी लढणाऱ्यांना सन्माननीय रक्कम जाहीर करावी.
> - **विजय सरदेसाई,** अध्यक्ष , गोवा फॉरवर्ड

> लईराई जत्रा येथे झालेल्या दुर्दैवी चेंगराचेंगरीच्या पार्श्वभूमीवर आम्ही परिस्थितीवर त्वरित नियंत्रण मिळवण्यासाठी पावले उचलली आहेत. जे गंभीर जखमी आहेत त्यांचे जीव वाचवण्याचे आटोकाट प्रयत्न सुरु आहेत. मला या दुर्दैवी घटनेबद्धल तीव्र दुःख आहे.
> - **विश्वजित राणे,** आरोग्य मंत्री

> पंतप्रधान कार्यालय (पीएमओ) वैयक्तिकरित्या परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे आणि केंद्राने गोवा सरकारला सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले आहे.
> - **दामू नाईक,** भाजप प्रदेशाध्यक्ष

> आदित्यचा चेहरा पूर्णपणे विकृत झाला होता. ५० ते ६० लोक त्यांच्या अंगावरून चालत गेले. नुकतीच त्याने दहावीची परीक्षा उत्तीर्ण केली होती आणि म्हापसा येथील महाविद्यालयात अकरावीत प्रवेश घेतला होता. तो घरचा एकुलता एक मुलगा होता आणि त्याला एक बहीण आहे. दुर्घटनेच्या वेळी त्याची आई सोबत होती, पण ती काहीही करू शकली नाही.
> -**राजेश कवठणकर** , मयत पुतण्याचे काका

# बिट्स पिलानीमधील विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांच्या चौकशीची मागणी

■ टीम दैनिक हेराल्ड



**मडगाव, दि. ३ :** बिट्स पिलानी शिक्षण संस्थेतील ३ विद्यार्थ्यांच्या अलीकडील आत्महत्येच्या घटनेनंतर महिला हक्क संघटना बायलांचो एकवोट’ने या प्रकरणी गंभीर चिंता व्यक्त केली आहे. संस्थेच्या परिसरात रॅगिंग तसेच मानसिक आरोग्य सेवांचा अभाव ही संभाव्य कारणे मानून संघटनेने सखोल चौकशीची मागणी केली आहे.

‘बायलांचो एकवोट’ ’ अध्यक्षा आवदा व्हिएगस यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, गेल्या पाच महिन्यांत संस्थेतील तीन विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याची माहिती असून ही मालिका अत्यंत चिंताजनक आहे. या घटना केवळ वैयक्तिक नसून संस्थात्मक पातळीवर काही त्रुटी आहेत, हे दर्शवतात, असेही त्यांनी नमूद केले.

कॅम्पसमध्ये रॅगिंग सुरू आहे का आणि विद्यार्थ्यांकडून तक्रारी का केल्या जात नाहीत, याचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. अशा परिस्थितीत भीती, शांतता किंवा संस्थेवरील अविश्वास यांचे वातावरण आहे का, हे समजून घेणे आवश्यक आहे, असा सवाल व्हिएगस यांनी उपस्थित केला.

त्यांनी पुढे सांगितले की, विद्यार्थ्यांना वेळेवर मानसिक आरोग्याची मदत मिळते का, याची खातरजमा करणे तातडीचे आहे. या घटनांमागे शैक्षणिक ताण, सामाजिक एकाकीपणा, रॅगिंग अथवा मानसिक छळ ही कारणे असू शकतात आणि त्याचा शोध घेणे अत्यावश्यक आहे.

तरुण, गुणी विद्यार्थी जेव्हा स्वतःला इजा करण्याचा मार्ग निवडतात, तेव्हा ती शिक्षण व्यवस्थेसाठी मोठी शोकांतिका ठरते. यामधून योग्य धडे घेत, बदल घडवणं गरजेचं आहे, असे व्हिएगस यांनी स्पष्ट केले.

तसेच, अशा घटनांची पारदर्शक चौकशी करून विद्यार्थ्यांवरील मानसिक दडपणाची कारणमीमांसा करावी, अशी मागणीही त्यांनी केली. संस्थांनी केवळ शैक्षणिक गुणवत्तेवर भर न देता, विद्यार्थ्यांच्या भावनिक आणि मानसिक आरोग्यालाही तितकेच महत्त्व द्यावे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

विद्यार्थ्यांना सूडाची भीती न बाळगता आपली समस्या मोकळेपणाने मांडता यावी यासाठी निनावी तक्रार पेटी किंवा सुरक्षित संवाद यंत्रणा उपलब्ध करून देण्याची शिफारस त्यांनी केली.

शिक्षण संस्था म्हणजे केवळ अभ्यासाचे ठिकाण नसून, व्यक्तिमत्व विकासाचेही केंद्र असायला हवे. येथे कुणालाही अडकलेपण किंवा असहाय्यता जाणवू नये, असे आवदा व्हिएगस यांनी ठामपणे सांगितले.

‘बायलांचो एकवोट’ ’संस्थेने शिक्षण प्रशासनाला प्रशिक्षणप्राप्त मानसिक आरोग्य व्यावसायिकांची नियुक्ती करण्याचे आणि विद्यार्थ्यांना मदतीसाठी पुढे येण्यास प्रोत्साहित करणारी प्रणाली विकसित करण्याचे आवाहन केले आहे.

# आर्किटेक्चर कॉलेजमध्ये परीक्षेतील गैरव्यवहार उघड

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ३ :** आल्तिनो येथील गोवा कॉलेज ऑफ आर्किटेक्चरमध्ये परीक्षा विभागात गैरव्यवहार आणि निकाल पत्रकांमध्ये कथित फेरफार झाल्याचा प्रकार समोर आला आहे. यासंदर्भात तीन प्राध्यापकांनी प्राचार्यांकडे तक्रार दाखल करत परीक्षा प्रभारी अनिरुद्ध पवार यांच्यावर तात्काळ कारवाईची मागणी केली आहे.

ही घटना जानेवारी महिन्यात उघडकीस आली, जेव्हा सेमिस्टर तिसरा (व्हिज्युअल आर्ट्स अँड क्राफ्ट्स) आणि सेमिस्टर सातवा (डिझाईन स्टुडिओ) यांचे सीलबंद ग्रेडिंग लिफाफे गायब झाल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर, व्हिज्युअल आर्ट्स अँड क्राफ्ट्सच्या ग्रेडिंग शीटमध्ये फेरफार झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.

प्राप्त माहितीनुसार, अभ्यासक्रम संयोजक बीना गंगाणी यांनी बनावट ग्रेड पत्रक तयार करून परीक्षा प्रभारींना सुपूर्द केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. परीक्षा समितीच्या परवानगीविना हे पत्रक वापरून ७ फेब्रुवारी रोजी निकाल जाहीर करण्यात आला. विशेष म्हणजे, मूळ सीलबंद लिफाफे एका आठवड्यानंतर पुन्हा सापडले.

डिझाईन स्टुडिओसाठी मूळ ग्रेड शीटवर परीक्षक विश्वेश कांदोळकर यांच्या नेतृत्वाखालील समितीची स्वाक्षरी होती, तर व्हिज्युअल आर्ट्ससाठी बीना गंगाणी यांच्या पथकाची स्वाक्षरी होती. तथापि, प्रभारी पवार यांनी बनावट ग्रेड वापरून तिसऱ्या सेमिस्टरचा निकाल प्रसिद्ध केल्याचा आरोप आहे.

यासंदर्भात गोवा विद्यापीठाच्या अभ्यास मंडळाच्या सदस्या आणि कॉलेजच्या माजी परीक्षा प्रभारी डॉ. गौरी देसाई यांनी प्राचार्य तसेच कुलगुरूंना पत्र लिहून आपली गंभीर चिंता व्यक्त केली आहे. त्या म्हणाल्या, मूळ लिफाफे न उघडता घेतलेली पुरवणी परीक्षा आणि त्यातून जाहीर झालेले निकाल शंकेच्या भोवऱ्यात आहेत.

या प्रकरणामुळे परीक्षा विभागाच्या विश्वासार्हतेवर मोठा प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे. तक्रारदार प्राध्यापकांनी दोषींवर कठोर शिस्तभंगात्मक कारवाईची मागणी केली आहे.

# मिशनरीज ऑफ चॅरिटीवर असिस्टेन्सियाचा दबाव ?

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ३ :** सांतइनेझ येथील निराधारांसाठी असलेल्या मदर तेरेसांच्या मिशनरीज ऑफ चॅरिटी’ संस्थेचे घर रिकामे करण्याच्या निर्णयामागे असिस्टेन्सिया गोवा जबाबदार असल्याचा आरोप गोव्यातील चिंतित नागरिकांनी शनिवारी पत्रकार परिषदेत केला.

या वेळी सामाजिक कार्यकर्ते ॲव्हर्टिनो मिरांडा म्हणाले की, सदर संस्था आपला हेतू साध्य करण्यासाठी योग्य पद्धतीने आश्रयस्थान चालवू शकत नव्हती. म्हणूनच मदर तेरेसांना हे घर चालवण्याचे आमंत्रण दिले गेले होते. ७ मार्च १९७६ रोजीच्या व्यवस्थापन समितीच्या नोंदीनुसार, असिस्टेन्सिया गोवाने त्यांना घर ताब्यात देण्यास सहमती दर्शविली होती.

२०१३ साली जमिनीच्या विकासासाठी सिस्टर्स आणि असिस्टेन्सिया यांच्यात वाटाघाटी झाल्या. त्यानुसार, सुमारे ८५% जागेवर मिशनरीज ऑफ चॅरिटीचा ताबा राहील आणि उर्वरित १५% जागा असिस्टेन्सिया गोवा स्वतः कडे राखून ठेवेल, असे ठरले होते. मात्र, २०१४ मध्ये हा करार बदलून सिस्टर्सचा वाटा ७८% पर्यंत घटवण्यात आला आणि असिस्टेन्सियाचा वाटा २२% करण्यात आला, असे मिरांडा यांनी सांगितले.त्यांनी मागणी केली की, असिस्टेन्सिया गोवाचे अध्यक्षांनी या करारासंदर्भात पारदर्शकता ठेवून माहिती जाहीर करावी, जेणेकरून मिशनरीज ऑफ चॅरिटीला अन्यायकारक वागणूक दिली जाणार नाही.

मिरांडा आणि इतर कार्यकर्त्यांनी याकडे लक्ष वेधले की, गेल्या दहा वर्षांहून अधिक काळ या घराची कोणतीही दुरुस्ती करण्यात आलेली नाही. त्यामुळे येथील बंदिवान आणि सेवेत असलेल्या सिस्टर्सना गंभीर धोका निर्माण झाला आहे. दाखल आश्रितांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक त्या दुरुस्त्या करण्यास मिशनरीज ऑफ चॅरिटीला परवानगी नव्हती आणि असिस्टेन्सियानेही स्वतःहून काही उपाय केले नाहीत, असा आरोप मिरांडा यांनी केला.२०१३ पासून आजपर्यंत असिस्टेन्सिया गोवा आणि सिस्टर्स यांच्यात झालेल्या सर्व बैठका आणि निर्णयांचे इतिवृत्त खुलेपणाने जाहीर केले जावे, अशी ठाम मागणी मिरांडा यांनी केली.

# वेरे-वाघुर्मे परिसरात गव्यांचा मुक्त संचार

■ टीम दैनिक हेराल्ड



**फोंडा, दि. ३ :** कुळागर - बागायत परिसरात जंगली गव्याच्या मुक्त वावरामुळे प्रियोळ मतदारसंघातील वेरे-वाघुर्मे पंचायत कक्षेत्रात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. केरी व बेत की-खंडोळा पंचायतीच्या हद्दीतही गव्यांचे कळप वारंवार दिसत असून, शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असल्याची माहिती समोर येत आहे.

स्थानिक रहिवाशांनी दिलेल्या माहितीनुसार, घानो, सावे आणि शिलवाडा या भागांमध्ये गव्यांच्या मुक्त संचाराचे प्रमाण वाढले आहे. बुधवारी घानो परिसरातील कुळागर भागात एक गवा निर्भयपणे फिरताना दिसला. या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून, नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण आहे.

सावईवेरे येथील एका बागायतदाराने सांगितले की, डोंगराळ भाग असलेल्या या परिसरात अननस उत्पादन मोठ्या प्रमाणावर होते. पूर्वी माकडांचा त्रास होत असताना, आता गवे व अन्य वन्य प्राणी शेत क्षेत्रात घुसत असून, त्यांच्यामुळे अननस, केळी व काजू यांसारखी पिके उद्ध्वस्त होत आहेत. गव्यांमुळे वारंवार होणाऱ्या हानीमुळे बागायती शेती धोक्यात आली आहे.

स्थानिक नागरिकांनी वन विभागाला यासंदर्भात निवेदन दिले असून, बागायती भागात सुरक्षेच्या उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. कृषी विभागाकडून अनुदान मिळण्याची योजना असली, तरी जमिनीच्या अपूर्ण कागदपत्रांमुळे बागायतदारांना लाभ मिळत नाही, असे नागरिकांचे म्हणणे आहे. वन विभाग आणि कृषी विभागाने प्राणी कल्याण संस्थांच्या सहकार्याने तात्काळ उपाययोजना कराव्यात, अशी मागणी जोर धरत आहे. अन्यथा बागायतदार शेती सोडण्याच्या विचारात आहेत, असेही काहींनी स्पष्ट केले.

दरम्यान, गेल्या वर्षी बेतोडा येथील बोंड बाग भागात एका महिलेला जंगली गव्याने हल्ला करून गंभीर जखमी केले होते. उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला होता. त्यानंतर फोंडा शहर व ढवळी महामार्गावरही गव्यांच्या वावराच्या घटना घडल्या होत्या. या पार्श्वभूमीवर वन विभागाने गांभीर्याने लक्ष घालण्याची गरज निर्माण झाली आहे.

# पहलगाम हल्ल्यांमागील नराधमांविरुद्ध लढा सुरू : फारुख अब्दुल्ला

**पीटीआय, दि. ३ :**

नॅशनल कॉन्फरन्सचे अध्यक्ष व जम्मू-काश्मीरचे माजी मुख्यमंत्री डॉ. फारुख अब्दुल्ला यांनी शनिवारी जम्मू आणि काश्मीरच्या जनतेला प्रगती व समृद्धीसाठी दहशतवादाविरोधात उभं राहण्याचे आवाहन केले.

अब्दुल्ला हे दक्षिण काश्मीरमधील हपटनार गावात पोहोचले होते, जिथे त्यांनी हल्ल्यात बळी गेलेल्या पोनी राईड ऑपरेटर आदिल हुसेन शाह यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली. शाह हे या हल्ल्यात प्राण गमावलेल्या २६ जणांपैकी एक होते.

शाह शहीद झाला. त्याने आपल्या प्राणांची आहुती दिली, तो प्राण्यांच्या बंदुकांना घाबरला नाही. ही खरी ’इन्सानियत’ आणि काश्मिरीयत आहे. जो घाबरतो तो आधीच मेला आहे, असे अब्दुल्ला म्हणाले.

ते पुढे म्हणाले की, काश्मीरमध्ये शांतता व विकास साधायचा असेल तर दहशतवाद्यांशी धैर्याने लढावे लागेल.आपण कधीही प्रगत किंवा समृद्ध होणार नाही, जोपर्यंत आपण दहशतवाद्यांशी ठामपणे मुकाबला करत नाही. आता वेळ आली आहे की लोकांनी धैर्य बाळगून अशा हिंसक प्रवृत्तींना थोपवावे, असेही त्यांनी स्पष्ट केले. भारताने हल्ल्यानंतर पाकिस्तानविरोधात कोणती पावले उचलली, यावर भाष्य करण्यास नकार देत आपले पंतप्रधान काय निर्णय घेतील, ते त्यांचे काम आहे असे अब्दुल्ला म्हणाले.

पाकिस्तान पीपल्स पार्टीचे नेते बिलावल भुट्टो-जरदारी यांनी सिंधू पाणी करारावर भारताने घेतलेल्या भूमिकेवर तीव्र प्रतिक्रिया दिल्यानंतर अब्दुल्ला म्हणाले भुट्टो काय बोलतात याला महत्त्व नाही. आपण त्यांच्या वक्तव्यांकडे दुर्लक्ष केलं पाहिजे, अन्यथा आपण पुढे जाऊ शकणार नाही.

पहलगाम हल्ल्यानंतर भारताने सिंधू पाणी करार स्थगित केल्यानंतर, भुट्टो-जरदारी यांनी दिलेली सिंधू आमची आहे, एकतर त्यातून पाणी वाहील किंवा रक्त अशी तीव्र प्रतिक्रिया भारतात चर्चेचा विषय ठरली होती.